REVIEW OF RESEARCH

जी.ए.कुलकर्णी यांच्या कथांमधील नियतीवाद

डॉ. संजीव कुलकर्णी

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



प्रस्तावना :

जी. ए. कुलकर्णी या मराठीतील महान लेखकाचे मूळ गाव कर्नाटकातील एकसंबा हे होते. त्यांचा जन्म १० जुलै १९२३रोजी बेळगावातील कोनवाळ गल्लीत झाला. त्यांचे प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणही बेळगावात झाले. मुंबई विद्यापीठातून त्यांनी इंग्रजी विषयात १९४३ साली बी. ए. व १९४६ साली एम. ए ही पदवी प्राप्त केली. १९४३ ते १९४५ च्या दरम्याने त्यांनी लिंगराज कॉलेज बेळगाव येथे नोकरी केली. १९४५ ते १९४६ या दरम्यान त्यांनी 'बी. के. मॉडेल हायस्कूल, बेळगाव" येथे नोकरी केली. १९४६ हे एकच वर्ष ते नोकरीसाठी मुंबईला गेले. त्यानंतर १९४७ ते १९४९ या दरम्यान त्यांनी 'बसवेश्वर आर्टस आणि सायन्स कॉलेज, बागलकोट' येथे नोकरी केली. त्यानंतर १९४९ ते १९५० या दरम्यान त्यांनी 'कॅनरा आर्ट्स ऍन्ड सायन्स कॉलेज, कुमठा' येथे नोकरी केली. त्यानंतरचा १९५० ते १९७८ हा प्रदीर्घ काळ ते 'जनता (जे.एस.एस.) कॉलेज. धारवाड येथे इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम करत होते. येथूनच ते विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले. १९८५ साली ते धारवाडहून पुण्याला आले. पुण्यात ११ डिसेंबर १९८७ रोजी त्यांचे रक्ताच्या कर्करोगाने निधन झाले.

जीएंच्या लेखनाची वैशिष्ट्ये

मराठी साहित्याच्या इतिहासातील काही प्रमुख साहित्यिकांमध्ये जी.ए. कुलकर्णी ('जीए') यांचे नाव घेतले जाते. जीएंनी प्रामुख्याने लघुकथा हा साहित्यप्रकार हाताळला. जीएंच्या लेखनाची प्रमुखा वैशिष्ट्ये पाहू जाता त्यामध्ये जीएंचा उपमा व उत्प्रेक्षांचा (प्रतिमांचा) सोस हे पहिले वैशिष्ट्य ध्यानात येते. .एं. च्या कथांमधील भाषा ही उपमा–उत्प्रेक्षांनी खच्चून भरलेली तरीही घरगुती साधी आणि नैसर्गिक आहे. बऱ्याच वेळा त्यांनी वापरलेल्या उपमा वाचताना वाचक थबकतो, थोडेसे मागे जाऊन ते वाक्य परत वाचतो आणि श्या माणसाला हे कसे सुचले असेल? असा विचार करू लागतो. त्यांच्या लेखनातील प्रतिमांच्या अतिरेकी वापराच्या सोसासाठी त्यांच्यावर टीकाही झाली आहे. जीएंच्या समीक्षकांना आणि टीकाकारांना त्यांची भाषा कृत्रीम आणि उबवलेली वाटते. पण पूर्वग्रहाचे गाठोडे डोक्यावरुन काढून ठेवून निर्मळ मनाने जीएंच्या कथा वाचल्या तर त्या भाषेमागची जन्मजात प्रतिभा आणि ती भाषा घडवण्यासाठी जीएंनी घेतले अपार कष्ट ध्यानात येतात.

अमुकसारखे किंवा अमुकप्रमाणेश याशिवाय जी.एं. ची कथा पुढे सरकतच नाही. ही मानली तर जी .एं. ची मर्यादाही आहे, पण जी.एं. च्या या उपमा यज्ञात हात घालून जळता निखारा बाहेर काढावा तशा अति तेजस्वी जळजळीत असतात. मग त्यांच्या कथेत कधी गाव एका कुशीवर घेऊन पसरलेली वाळू आणि तिच्यावर वाळत घातलेल्या निळसर चुणीदार वस्त्राप्रमाणे दिसणाराश समुद्र असतो, कुत्सित, कपटी डोळ्यांप्रमाणे दिसणाऱ्या खिडक्या असलेले एखाद्या अजस्त्र जबड्यासारखे दिसणारे जुने घर असते, भिंतीला हात लावताच मोगरा फुलवणारी आणि एका मृदू शब्दाने ऐकणाऱ्याच्या मनावर कशिदा काढणारी बहिण असते, भरतीच्या वेळी मोठमोठे हिरवे फणे काढून

वाढणारे पाणी असते, प्रदर्शनातील काकडीप्रमाणे जाड, निबर दिसणारी मुलगी असते आणि मुठी घट्ट आवळून सोवळ्याच्या काठीप्रमाणे ताठ, निर्जिव उभी असलेलीरुक्मिणी असते.जी.एं. च्या पराभव या एका कथेत या अप्रतिम उपमा आलेल्या आहेत.[१]

रक्तचंदन या कथासंग्रहातील सोडवण[२] या पुढच्या कथेत जुनेर्‍याची घडी करून त्यावर स्वच्छ धुतलेले तांदळाचे दाणे रांगेने मांडावेत तसे टाके घालणारी डॉ. फाटकांची आई आहे, एखाद्या फळावर अळी बसावी तसे उभट, ठिपक्यांसारखे डोळे घेऊन बसलेले डॉक्टर दाते आहेत, चेहर्‍याच्या कडा मोडून बाहेर पडणार असे वाटण्यासारखा टवटवीतपणा असलेली वृंदा आहे, डॉक्टर पाठकांवर दुपारी येऊन आदळणारा काळ्या, जळजळीत लाटेसारखा त्यांचा भूतकाळ आहे, जमिनीवर फोड उठावेत तशी त्यांच्या आसपास विखुरलेली सिगारेटीची थोटके आहेत, स्वतःच्या लालसर, गुळगुळीत चेहर्‍याच्या जागी आपल्या आयुष्याचा तसलाच कंद बाळगणारा दिवगी आहे, अंगात मॅग्नेशियमची तार जळाल्याप्रमाणे भाजत उजळून डॉक्टरांची सोडवण करणारा मृत्यू आहे.

जीएंच्या लेखनातील नियतीवाद

याशिवाय जीएंच्या कथा निराशावादी असतात, त्या माणसाची उमेद खच्ची करण्याचे काम करतात, आणि मानवी आयुष्याची आणि मानवी प्रयत्नांची निरर्थकताच अधोरेखित करतात असा जीएंच्या लेखनावर आरोप केला जातो. एका अर्थी ते खरेही आहे. माणसांमाणसांमधली नाती निवडण्याचे माफकचस्वातंत्र्य माणसाला असते. रक्ताच्या नात्यांचे सोडा, ती नाती तर सटवाईच आपल्या कपाळावरच गोंदून जात असते. पण त्या नात्यांशी नाळ जुळेलच असे नाही, किंबहुना बर्‍याच वेळा ती जुळत नाहीच. जिथे आतडे गुंतते त्या नात्यांना तर नावाचीही लेबले लावता येत नाहीत. तसे बघायला गेले तर सगळे काही तोडून जाताना हात गच्च हातात घेऊन डोळ्यांत पाणी आणणार्‍या पिशव्या विठोबाचे आणि जॅकचे काय नाते आहे? खरे तर काहीच नाही. पण हे कुणीही पिशव्या विठोबा किती जॅकना म्हणू शकेल? विशाल आणि विक्राळ सागरातले असंख्य थेंब. त्यातले काही थोडा काळ एकमेकांना चिकटून राहतात. मग त्यातल्या कुणा एकाची वाफ होऊन जाते. तो अचानकच निघून जातो. विक्राळ सागराचे हेलकावणे सुरुच राहते. इतर थेंब त्या जाणार्‍या थेंबाला निरोपाच्या शेवटच्या क्षणी काय म्हणत असतील? असंख्य सागर, त्याचे सतत हेलकावणे, असंख्य थेंब, येणे, जाणे, जाणे, येणे....समजत नाही, समजत नाही.....[३]

लेबले लावून चिकटवलेली, हळदकुंकू वाहून घरी आणलेली नाती तरी राहतील का जुन्या चपलेचा अंगठा उसवून तुटून जावा तशी फिसकटून जातील ते कुणी सांगावे? सण्ण्याचा सख्खा भाऊ बाबू. पण लग्न होऊन सण्ण्याच्या घरी आलेली गौरी छातीचे खोके झालेल्या, तांबारलेल्या डोळ्यांच्या गांजेकस बाबूच्या घरी राजरोसपणे राहायला आली ते तिला काय कमी पडले म्हणून? आणि जे कमी पडले ते तरी तिला बाबूच्या घरी मिळाले का? तिच्या उफाड्याच्या, कदाचित उपाशी शरीराची हाक तरी गांजाने शरीराचे अणि मनाचे गाठोडे झालेल्या बाबूच्या कानावर गेली असेल का? आता या प्रश्नांची उत्तरे कुठल्या दिक्काला जाऊन बसली आहेत कुणास ठाऊक! पण सण्ण्याच्या नावाने नवरा म्हणून पावलीइतके कुंकू लावणारी गौरी चवचाल वेसवेसारखी त्याच्या सख्ख्या भावाबरोबर, आपल्या दिराबरोबर राहिली आणि एक दिवस मरुन गेली हे माणसामाणसांमधले कुठले समीकरण म्हणायचे? आणि त्यात सण्ण्याचा काय दोष? त्याने गौरीच्या डोक्यावर पदर घातला हा? तिच्यावर मनापासून प्रेम केले हा? [४] जी कथा सण्ण्याची, तीच गोविंदाचार्याची. त्याची बायको तर कुरुप, खेडवळ अगदी आकारहीन. पण तिच्यावरसुद्धा प्रेम करणार्‍या गोविंदाचार्याला सोडून ती राजरोस दादू गवळ्याचा हात धरुन फिरु लागली ते गोविंदाचार्याचा कुठला फासा चुकीचा पडला म्हणून? [५] मानवी नात्यांचे हे असलेच काही तिरपागडे असते. घोटभर पाण्याची अपेक्षा असते माणसाची, पण तितकीही त्याला ती नियती नावाची अदृष्य चेटकीण पुरी होऊ देत नाही. श्रीपाद तसे बघायला गेले तर लक्ष्मीचा सावत्र मुलगा. त्याच्यावर जीव लावावा असा काही लक्ष्मीचा नवस नाही. पण लक्ष्मी मुळातच सुपाएवढ्या काळजाची आहे. आपल्या दोन सख्ख्या मुलांबरोबर श्रीपादच्याही टाळूवर आपल्या मायेची सावली पडावी एवढीच तिची भाबडी आशा आहे. पण तसले कुठले व्हायला? तिचा प्रेमाचा हात श्रीपादने कायम क्रूरपणाने झिडकारला आणि हातातली कसलीतरी काठी एका जुन्या चाकूने खरवडत तो निर्विकारपणे बसून राहिला. त्याचे एकवेळ सोडा, तो तर येऊन जाऊन सावत्रच मुलगा. [६] पण लक्ष्मीने ज्याच्याशी दुसरेपणावर लग्न केले तो केसूभट नाहीतर करेव्वानेही ज्याच्याशी दुसरेपणावर लग्न केले तो तिरक्या यांना या नात्यांमधून या बायकांच्या हाताला शेवटी काय लागले? ही तर बावनकशी नवरा–बायकोची नाती ना? पण या नात्यांचेही

लपवता न येणारे कोड होऊन बसावे आणि तशा कुजक्या नात्यांना या सरळ मनाच्या बायकांनी त्यांच्या शरीराचे खत पडेपर्यंत सांभाळायला लागावे असे त्यांच्या हातून काय पाप घडले असावे? शांताक्कांच्या अजाण, कोवळ्या देहावर समाजातले आदर्श म्हणून प्रसिद्ध असलेल्या दादासाहेबांनी आसुसून झेप घेतली आणि नाईलाजाने दिनूमामाच्या बंदुकीला घाबरुन त्यांच्या गळ्यात काळ्या मण्याची पोत घातली हे खरे, पण नंतर त्यांचे मन आणि शरीर गुंतले ते रुपाने खूपच उजव्या असलेल्या शांताक्कांच्या सख्ख्या धाकट्या बहिणीमध्ये– जान्हवीमध्ये! म्हणजे लग्नाआधी जबरदस्तीने सवाष्ण झालेल्या शांताक्का नंतर आयुष्यभर सौभाग्यवती असून कुमारीच राहिल्या की! हे नवरा बायकोचे कसले कुरुप नाते म्हणायचे? आणि पुन्हा, यात शांताक्कांचा काय दोष? पण जो आहे तो सगळा दोष दादासाहेबांचाच आहे का? मग तसे असले तर पण माझं ऐकणार कोण? या आबाजींच्या तोंडी असलेल्या पालुपदाचे दादासाहेबांच्या अर्धपुतळ्यावरून येतात असे का वाटते? समजत नाही, समजत नाही.....[७]

मानेवर कोड असलेल्या मेधाला फसवून कंटाळवाण्या रूपवान लिलूशी लग्न करणाऱ्या माधवला मेधाच्या आईने निरोप घेण्याआधी सगळेच गुपीत उघडे करून सांगितले आणि मग माधवचे सगळे अस्तित्वच शरमेने बुळबुळीत होऊन बसले. पण आपले मन कधी जिच्यावर जडले होते ती मेधा आणि आज आपल्या नावाने कुंकू लावणारी लिलू यातले कुणाचे कोण याचा त्याला तरी उलगडा झाला आहे का? बरे तर बरे, एखादी तरारलेली वेल उपटून टाकावी तसे लिलूने अरविंदाच्या आयुष्याचे केलेले वाटोळे माधवला माहीतीच नाही. नाहीतर अशा कुस्करत जाणाऱ्या नात्यांचा शोध घेत घेत त्याला किती मागे जावे लागले असते? आणि कशासाठी?[८] वासनेने आंधळा होऊन राधेच्या छातीवर आपली बोटे फिरवणारा बाबाजी लक्षुमीचा नवरा, पण हिवाळ्यात कौलारु छतातून टपटप खाली पडणाऱ्या केसाळ सुरवंटांना बाहेर फेकून द्यावे तसे त्या नात्याला लक्षुमीने झिडकारुन टाकले आहे खरे, पण तिच्या मनातदेखीलदोन महिन्यांपूर्वी तिच्या कमरेला तिच्या इच्छेने, नव्हे, तिच्या आग्रहाने डॉक्टरांनी घातलेल्या विळख्याची ठसठस आहे.[८] अशी ही एकात एक, एकात एक अडकलेली नात्यांची साखळी सोडवत बसायची झाली तर त्याला किती जन्म घ्यावे लागतील? जन्माला येताना माणसाच्या डोळ्यांचा जो आकार असतो तो मरेपर्यंत तसाच राहातो. पण प्रत्येकाला दुसऱ्याच्या डोळ्यांत वेगळे प्रतिबिंब दिसते. त्या अर्थाने प्रत्येकाला दिसणारे डोळे वेगळेच. म्हणजे माणूस तोच, डोळे तेच, पण प्रत्येकाला दिसते ते भलतेच. आपल्या भावावर, माधववर, अगदी मनापासून जीव असलेली, त्याच्यासाठी मुसळधार पावसात छत्री घेऊन त्याला शाळेतून आणायला जाणारी, त्याच्यासाठी अबोली–मोगऱ्याची फुले घातलेली बशी ठेवून त्याची खोली सजवणारी आणि त्याचे एखाद्या चांगल्या, गुणी मुलीशी लग्न होऊन त्याचे आयुष्य सुखाने जावे एवढीच इच्छा बाळगणारी साध्या मनाची रुक्मिणी. पण तिच्या सख्ख्या आईबरोबरचे तिचे संबंध किती काटेरी, विषारी आणि पिळ्यापिळ्याचे आहेत! बरे, आईचीही माधववर तेवढीच माया आहे. आपले दुखरे गुडघे हाताने दाबत तिने माधवसाठी तेल–तिखट लावलेले पोहे केले, कपभर चहा केला, पण तो माधवने घेतल्याचे बघण्याचे समाधान तिच्या नशिबी नाही. माधवचे काय, त्याची तर ती सख्खी आई आणि सख्खी बहीण. त्यात तो कसे डावे–उजवे करणार? आता हा मानवी नातेसंबंधांचा समद्विभुज त्रिकोण कसा सोडवायचा? [९] पेरवाच्या बागेत उन्हे उतरत असताना ताडमाड वाढलेल्या पण डोक्याला आतून किंचित तडा गेलेल्या दामूच्या दंडात नखे रुतवताना यौवन उतू जात असलेल्या कमळीला त्याच्याकडून फक्त काय आपल्या शरीराची तहानच शमवायची आहे? आणि तसे असते तर त्यासाठी तिला वाट्टेल तितके लडदू मिळाले असते की. मग आपले गुलाबाच्या कळीसारखे शरीर दामूच्याच हवाली करावे आणि समाधानाने डोळे मिटून घ्यावे असे कमळीला दामूत काय दिसले ते तिचे तिलाच ठाऊक.[१०] एकीकडे हे असले मळक्या सदऱ्याच्या ओच्यात पारिजातकाचा सडा पडावा तसले दामूचे नशीब म्हणायचे आणि निशिगंधाची फुले हातावर ठेवून खालच्या मानेने 'मी तुमच्या आयुष्यात येऊ शकेन का?' असे विचारणाऱ्या रेखाला नकार देण्याची तडजोड दत्तूला करावी लागते हे त्याचे नशीब म्हणायचे. [११]आणि हे असे का हे कदाचित कुणालाच सांगता येणार नाही! समजत नाही, समजत नाही.....

घरात दिवा लावायला एक मुलगी असावी असेक प्रत्येक बापाला वाटते. बापूच्या घरात तशी शैलू आहेही. तिच्या कानवल्याएवढ्या अशक्त शरीराला तो मायेने जवळ घेतो 'डुमरी गं बाई, ढमाबाई!' म्हणून तिच्या पोटाला गुदगुल्या करतो आणि तिच्या उराची धडधड त्याला जाणवते. [१२] हे प्रेमाचे ओले नाते एकीकडे आणि विठी जोगतिणीच्या धुंद प्रेमातून जन्माला आलेल्या अमाशीचे बेडकासारखे फुटून, चिरडून मरुन जाण्याचे स्वतरूच्या डोळ्यांनी बघायला लागण्याचे नशीब भाळी असलेल्या सखारामाचे आपल्या लेकीबरोबरचे हतबल नाते एकीकडे. [१३]आई–वडीलांकडे ज्यांचे बोट धरुन उभे राहायला शिकावे असे मायाळू झाड म्हणून बघत असावे आणि त्याच

झाडाच्या काटेरी फांदीने अंगावर रक्त उमटावे हे असले नाते कुणी जन्माला घातले असावे? आणि का? सरड्यासारखे पाय घेऊन जन्माला आली हा काय काशीचा दोष आहे का? पण त्यासाठी तिला तिच्या सख्ख्या जन्मदात्या बापाकडून मिळाले काय? तर आयुष्यभर तुच्छता, अपमान आणि हिडीसफिडीस. आणि तो बाप मेला तरी तिचे आयुष्य तसेच खरकटे राहिले! [१४] काशीचे तसे तर सदूभाऊ आणि सीताबाईचे अगदी उरफाटे. सदाभाऊने केले काय? तर आयुष्यभर घरगुती गिऱ्हाइकांना खमंग, झणझणीत मसाला भजी, चरचरीत उसळ आणि जाड, कापडाच्या पट्टीसारखा चहा दिला आणि आपले गावठी हॉटेल फारसा पैसा न मिळवता पण अगदी स्वच्छ टोपीने चालवले. पण त्याच्या मुलाच्या धंद्याच्या नवीन गणितात त्याला कुठेच जागा नाही. मग शेवटी आयुष्याचे गुंडगुळे होऊन नाईलाजाने गावाकडे परत चाललेला सदाभाऊ आणि त्याच्याबरोबर थंडीने काकडत उभी असलेली आणि कधीच फारसे न बोलणारी सीताबाई यांचे त्यांच्या मुलाबरोबरचे हे असले कसले वांझोटे नाते म्हणायचे? [१५] प्रेमाच्या नावाखाली प्रतारणा यात काही नवीन असे नाही, पण इतर वेळी लहान मुलांचे लाड करणारा दादूभट वकिलाच्या पोराच्या गळ्यातली सोन्याची साखळी लुबाडण्यासाठी देवळात, देवासमोर झाऱ्याचं त्याच्या गळ्यात झाऱ्याचं टोक खुपसतो तेंव्हा माणसांमाणसांमधल्या नात्यांना काही अर्थ आहे का नाही असले प्रश्नचिन्ह मनात उभे राहाते. [१६] तहानलेल्याला पाणी मिळू नये अशीच जर नियतीची योजना असली तर आई–वडीलांच्या पोटात चार घास पडावेत, भावांच्या डोक्यावर टोपी यावी म्हणून वयाचे कोवळेपण विसरुन आपल्या आयुष्याची राख करणारी सुम्मी शेवटी यातले काहीही करु शकत नाही आणि सासुरवासाने निमूटपणाने मरुन जाते हा नियतीचा न्यायच म्हणायचा की. [१७]

म्हणजे शेवटी काय? आपल्याला कुणीच नाही, आपले कुणीच नाही आणि अश्वत्थ वृक्षाच्या प्रत्येक क्षणाला गळून पडणाऱ्या हजारो पानांप्रमाणे आपले असणे काय किंवा नसणे काय ही एक केवळ निरर्थक अटळ प्रक्रिया आहे हेच खरे. मग या वृक्षाच्या खाली पडणाऱ्या पानांचा खाली पडता पडता एकमेकांना होणारा ओझरता स्पर्श हीच मानवी नातेसंबंधांची व्याख्या आहे काय? आणि तसे असले तर मी, माझे असा लसलसाट तरी कशासाठी? प्रेमाचे सोडा, ते काय प्रत्येकाच्या नशिबात येतेच असे नाही, पण किमान आपला द्वेष करणारे, आपल्यावर सूड उगवण्याची वाट बघत बसणारेही कुणी नाही या भावनेने रडणाऱ्या सीताक्काला [१८] बाई, ही तुझीच नव्हे, तर प्रत्येकाची कथा आहे हे साक्षात मृत्यूनेच समजावून सांगावे काय?

माणसामाणसांमधल्या नातेसंबंधांचा हाच अर्थ असेल तर त्या संबंधांना काहीच अर्थ नाही हेच खरे. जन्म घेणे हे माणसाच्या हातात नाही. जगणे ही बहुतेकांसाठी अटळ, कदाचित कंटाळवाणी अपरिहार्य प्रक्रिया आहे, मृत्यू हा बाकी मानवी जीवनाला अर्थ देणारा उत्कर्षबिंदू आहे. अपरिहार्य, अटळ आणि कदाचित म्हणूनच अतिशय आकर्षक असलेले माणसाचे मृत्यूशी असलेले नाते. दानय्याच्या आयुष्याची एक लालभडक न संपणारी वेदनाच करणाऱ्या रुकमीपासून त्याची सुटका करणाऱ्या केशरनागासारखा आकर्षक मृत्यू.[१९] वडाच्या झाडावरुन उडी मारुन पोरांना विमान दाखवताना मान मोडून घेणाऱ्या बळवंतमास्तराची काय, [२०] म्हातारीचा हात धरुन कपिलतीर्थातील हिरव्या पाण्यात उतरणाऱ्या लक्ष्मीची काय , मुखवट्याखाली डोसके चिरडून घेणाऱ्या यमनीची काय [२१], सूर्याच्या मूक आमंत्रणाला प्रतिसाद देऊन आणखी एक पायरी उतरणाऱ्या रमाची काय[२२], सोन्याचा खजिना शोधताना शेवटी स्मशानातच लाकडासारखे थंडगार होऊन पडलेल्या भैरुची काय [१६] आणि हातातली काकणे किणकिणवत गोल अंधारात उडी मारणाऱ्या कावेरीची काय [२३] ज्यांचे आयुष्य म्हणजे एक न संपणारी वेदनाच झाली होती अशा असंख्य अनामिक, बिनचेहऱ्याच्या लोकांची जगण्याच्या कचाट्यातून सुटका करणारा तो करुणासागर मृत्यू. तो आहे म्हणून तर सगळ्या जगण्याला काहीतरी टिंबभर अर्थ आहे. त्या पूर्णविरामाचे सगळ्या निरर्थक आयुष्याला सौभाग्य आहे. तोच सगळ्यांच्या आयुष्याचा सूर्य आहे. कुणी गोपुरे बांधली असतील, कुणी वाडाभर सोने गोळा केले असेल, कुणी कोसभर जमीनीवर आपले नाव लावले असेल. पण सीमा ओलांडून पलीकडे जाताना सगळ्यांचे हात रिकामेच. तिथेतरी किमान एक रांग असावी लहान दिंडी उघडणाऱ्या द्वारपालांच्या वागण्यात थोडी नम्रता असावी. रिकाम्या हातांनी येणाऱ्या लोकांचे हात रिते नाहीत हे तरी त्यांना कळावे. मानवी नात्यांचा अर्थ ज्यांना सापडला नाही अशांनाही स्वच्छ निरंजन मनाने निरोप मिळावा. मिळेल?

ते देखील समजत नाही.

जी.एं. च्या लिखाणात सगळीकडे दिसून येणाऱ्या नियतीशरणतेची ही काही उदाहरणे आहेत. जी.एं. च्या कथांतील माणसे दुःखाने, वेदनेने, दारिद्र्याने पिचलेली, हतबल, असहाय झालेली असतात. नियती नावाच्या अदृष्य

शक्तीच्या फटकाऱ्याने मोडून पडलेली असतात. जेथे प्रयत्न आणि आशा संपून जाते अशा ओलसर, अंधाऱ्या कोपऱ्यात कशीबशी जगत मरणाची वाट पहात पडलेली असतात. हाडेकातडी टाकायला एक हक्काची जागा, दोन वेळचे गोळाभर अन्न आणि कुणाचातरी मायेचा एखादा शब्द अशा माफक अपेक्षाही ती नियती नावाची चेटकीण पूर्ण होऊ देत नाही आणि माणसाचे आयुष्यच दुःखाने गच्च गच्च होऊन जाते. जी.एं. च्या टीकाकारांनी याला जी.एं. चा एकसुरीपणा, निराशावाद, क्वचित पलायनवादही म्हटले आहे. पण जी.एं. चे लिखाण वाचताना तसे वाटत नाही. श्सगळी सुखी माणसे एकाच पद्धतीने सुखी असतात, पण प्रत्येक दुःखी माणसाच्या दुःखाचे तऱ्हा वेगळी असतेश या अर्थाचे टॉलस्टॉयचे वाक्य जी.एं. नी श्रक्तचंदनश या कथासंग्रहाच्या पहिल्या पानावर लिहिले आहे. जी.एं. च्या कथांमधील व्यक्ती दुःखाच्या अशाच वेगवेगळ्या जात्यांखाली भरडल्या गेल्या आहेत.

वामन देशपांडे यांच्या मते [२४] 'जीएंचा वाचक जीएंच्या कथेमधील मानवी असहायतेचा, वैफल्यग्रस्त जीवनाचा एक भाग होऊन जातो, त्यांच्या कथेमधील नातेसंबंधांचा दुवा होतो. शापित आयुष्याचे वाटेकरी अर्थशून्य जीवनात साफल्याचे क्षण शोधताना त्यांच्या कथेत ठाई ठाई दिसतात. औदासिन्यांनी वेढलेले दुरूखजर्जर माणसांचे कितीतरी नमुने त्यांनी पेश केले. मानवी मूल्यांची ध्यास घेतलेली पण परिस्थितीने र्‍हासाच्या खोल गर्तेत घसरत जाणारी , जाणीवेंचे उगम शोधता आयुष्याचा तळच उचकटून बसलेली माणसं फक्त त्यांच्याच कथांतून खऱ्या अर्थाने प्रकट झाली. शोकरसाचा एवढा परिपोष कुठल्याही भाषेत इतका अस्सल दिसणार नाही'

'जेथे आधारासाठी विश्वासाने वळावे तेथे आढळणारा घात आणि वंचना' ही जीएंच्या कथांमागच्या अनेक प्रेरणांपैकी एक प्रेरणा आणि लेखक या नात्याने जीएंना भावलेली भव्य, भीषण उत्कटता ही जीएंच्या कथांप्रमाणे जीएंच्या पत्रांचाही अविभाज्य भाग आहे असे दीपक घारे यांनी 'प्रिय जी.ए, स.न.वि.वि' या नंदा पैठणकर यांनी संपादित केलेल्या पुस्तकाच्या परीक्षणात म्हटले आहे.

ग. प्र. प्रधान यांच्या मते[२५] 'जीएंनी मानवी जीवनातील दुरूखाचा फार सूक्ष्मपणे अभ्यास केला होता. हे दुरूख ही बव्हंशाने नियतीची निर्मिती आहे असे त्यांना वाटत असे. माणसाचा दुष्टपणा, त्यांच्यातील परपीडनात आनंद वाटण्याची विकृती याचेही जीएंना पुरेपूर भान होते. त्यांनी जे अनुभवले, जे पाहिले आणि ज्याचे चिंतन केले त्या सर्वांतून त्यांच्यातील कलावंताला मानवी जीवनाचे जे सत्य प्रतीत झाले ते केथेच्या माध्यमातून व्यक्त करावे अशी प्रेरणा मिळाली. ज्या वेळी कलावंत एखादी निर्मिती करतो त्या वेळी तो जगापासून आणि स्वतरूच्या सुखदुरूखापासूनही दूर जाऊन तटस्थतेने या सर्व गोष्टींकडे पाहत असतो. कलावंताचे सर्जनशील मन हा स्फटिकमिनार (आयव्हरी टॉवर) असतो. अनुभवलेल्या वैयक्तिक सुखदुरूखांच्या लाटा या स्फतीकमिनाराच्या भिंतीपर्यंत येतात, परंतु त्यांना आत प्रवेश नसतो. या स्फटिकमिनारात कलेचा आकृतीबंध तयार होतो. अशा तऱ्हेची कलात्मक तटस्थता (आर्टिस्टिक डिटॅचमेंट) असल्याशिवाय असामान्य कलाकृती निर्माणच होऊ शकत नाही.

जीएंच्या कथांमधील शोकांतिकांचे आणि नियतीवादाचे मूळ जीएंनी अभ्यासलेल्या 'ग्रीक ट्रॅजेडीज' मध्ये आहे असे जीएंच्या काही अभ्यासकांचे, विशेषतरू धोंडो विठ्ठल देशपांडे [२६] यांचे मत आहे. वि.गो. कुलकर्णी यांच्या मते[२७] 'तर्कप्रामाण्य न मानणाऱ्या नियतीला कार्यकारणभावाचे बंधन नसते. पापाची परिणिती शोकात आणि पुण्याची सुखात व्हावी हा संकेत हा संकेत ही नियती मानत नाही. दुसरे असे की ग्रीक शोकांताची जातकुळीच वेगळी आहे. भारतीय तत्वज्ञानात सत्य विनाशाचा मार्ग दाखवू शकत नाही. ग्रीक नियती असले तर्क मानत नाही' 'प्राक्तनाचे वेध' या पुस्तकात एस.डी. इनामदार [२८] म्हणतात, 'जीवनात वावरणाऱ्या व्यक्तींचा स्थूल अनुभव काय आहे? इच्छा करावी ते मिळत नाही, नको ते वाट्याला येते आणि न टाळता येणारे भोग भोगावे लागतात. घडणाऱ्या घटनांचा अर्थ आणि संगती लागत नाही, काय घडेल याची शाश्वती नाही. आपण एकत्र का येतो, वियोग अटळ का होतो, पवित्र मानलेली नातीसुद्धा अर्थहीन का होतात इत्यादी प्रश्नांची उत्तरे कधीच मिळत नाहीत. मानवी नातेसंबंधांतील घटनांचा विचार केला तर प्रतिष्ठीत मानलेल्या नीतीकल्पनेसमोर प्रश्न उभे राहतात. ज्ञानाच्या शोधात असलेली माणसे दुरूखी होतात, तर अज्ञानात जगणारी माणसे समाधानी असतात. लबाड, फसवी, ढोंगी, फसणारी अशी अनेक माणसे जगत असतात ते, जीवनच अर्थहीन आहे.

'डोस्टोव्हस्कीची पात्रे एकेका कल्पनेनी झपाटलेली असतात आणि त्यांची जीवनकथा वाचताना आपल्याला भोवळ येते, मन गरगरायला लागते. तसे जी.ए.कुलकर्णी यांच्या कथा वाचताना वाटते. तसाच परिणाम चिं. त्यं. खानोलकरही करतात आणि गूढ, गंभीर, रौद्र असा निसर्ग व त्यात वावरणारी मनस्वी माणसे निर्माण करण्याबाबत जीए व खानोलकर एका गोत्राचे ठरतात. जगाचा जो प्रचंड व्यवहार आहे, त्यात व्यक्ती ही करूपदार्थ आहे आणि

ही वाऱ्याने गवताच्या काड्या भिरभिरत जातात तशी जात असते. असे होणार याची कल्पना नसल्याने आपण अनेक अहंकार बाळगतो, पण अखेर ब्रह्मांड उभे राहाते. स्ट्रिंडबर्गच्या विधानात उल्लेख केलेल्या वेदनेच्या नशीजवळ जाण्याचा प्रयत्न जीएंनी निष्ठापूर्वक व सातत्याने केला, पण हे करताना उबलेला रडवेपणा आणला नाही' असे 'वेदनेचा वेध' या शीर्षकाच्या 'महाराष्ट्र टाइम्स' च्या अग्रलेखात म्हटले आहे [२९] तर याच दिवशीच्या 'लोकसत्ता' च्या अग्रलेखात[३०] जीएंच्या कथांबद्दल लिहिताना 'जगाची बंधने तोडून माणूस पुढे जायला पहातो, त्यात घायाळ होतो, नाणी खोटी असतात, नकली असतात याचा प्रत्यय आल्याने असहाय होतो, आपण एकटेच आहोत या जाणिवेने निराश होतो आणि तरीही नव्या उमेदीने पुन्हा उभा रहातो या सूत्रांत गुंफलेल्या या कथांनी मराठी साहित्यात एक वेगळे दालन निर्माण केले' असे म्हटले आहे . 'जीवन ही एक प्रचंड आणि अटळ शिक्षा आहे. एकूणच जगणे म्हणजे म्हाताऱ्या, वांझोट्या प्रश्नांचा जनानखाना आहे अशा प्रकारची जीएंची जीवनविषयक धारणा आहे. कित्येकदा आशयात तोचतोचपणा येऊनसुद्धा त्यांचे लेखन कधीही कोरडे, रसहीन वाटत नाही. काळजाचा लचका तोडणारे दुरूख कधी आक्रस्ताळेपणाकडे झुकतसुद्धा नाही किंवा त्यांच्या कथांचा विस्तार ओसाड वाटत नाही. निरर्थकतेच्या शापात अडकलेल्या मानवी व्यवहारांच्या गुंतवळीत जे चौतन्यतत्त्व आहे ते जी. ए.रंग, रस, गंध यांच्या रुपातून शोधतात' असे रेणू देशपांडे यांनी लिहिले आहे. [३१]

समारोप

मानवी जीवनात प्रयत्नांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे आणि प्रयत्नाने माणूस आपल्याला हवे ते, अगदी सुखसुद्धा प्राप्त करु शकतो असे प्रयत्नवाद मानतो. नियतीवाद याच्या बरोबर उलट असे म्हणतो की मानवी प्रयत्नांना, आकांक्षांना, अपेक्षांना तसा काही फारसा अर्थ नाही. शेवटी माणसाने कितीही धडपड केली तरी माणसाच्या भविष्याचे दान नियती नावाच्या अदृश्य देवतेच्या किंवा चेटकिणीच्या हाती असते. जीएंच्या कथांमध्ये नियतीवादाचे हे सूत्र अधोरेखित केलेले आढळते.

संदर्भ

१. जीए.ए कुलकर्णी, 'पराभव', 'रक्तचंदन', पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९६६. पृ. क्र. १
२. जीए.ए कुलकर्णी, 'सोडवण ', 'रक्तचंदन', पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९६६. पृ. क्र. १
३. जी.ए. कुलकर्णी, 'माणसे अरभाट आणि चिल्लर, परचुरे प्रकाशन मंदिर, तिसरी आवृत्ती, मार्च २०००
४. जी.ए. कुलकर्णी, 'चंद्रावळ', 'निळासावळा, पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि., पहिली आवृत्ती, १९५९ पृ. क्र. १
५. जी.ए. कुलकर्णी, 'अवशेष', 'निळासावळा, पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि., पहिली आवृत्ती, १९५९ पृ. क्र. ३९
६. जी.ए.कुलकर्णी, 'लक्ष्मी ', 'पिंगळावेळ' पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९७७, पृ. क्र. २४३
७. जी.ए. कुलकर्णी, 'प्रदक्षिणा' 'काजळमाया' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२, पृ. क्र. १
८. . जी.ए.कुलकर्णी, 'रातराणी'', 'पारवा',पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६०, पृ. क्र. १०६
९. जी.ए.कुलकर्णी, 'नाग ', पारवा पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६०, पृ. क्र. ८३
१०. जी.ए.कुलकर्णी, 'कवठे', 'पिंगळावेळ' पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९७७, पृ. क्र.१७५
११. जी.ए.कुलकर्णी, 'माणूस नावाचा बेटा, 'हिरवे रावे', पॉप्युलर प्रकाशन, १९६२ , पृ. क्र. १९९
१२. जी.ए. कुलकर्णी 'गिधाडे'. 'हिरवे रावे', पॉप्युलर प्रकाशन, १९६२ पृ. क्र. १
१३. जी.ए.कुलकर्णी, 'बळी', पारवा पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६०, पृ. क्र. ७६
१४. जी.ए.कुलकर्णी, 'शलॉट', पारवा पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६०, पृ. क्र. ४१
१५. जी.ए. कुलकर्णी, 'माघारा' 'रक्तचंदन ' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६६ , पृ. क्र. १४५
१६. जी.ए. कुलकर्णी, 'अंजन', 'काजळमाया' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२, पृ. क्र. २४
१७. जी.ए. कुलकर्णी 'तुती'. 'हिरवे रावे', पॉप्युलर प्रकाशन, १९६२ पृ. क्र. २३
१८. जी.ए. कुलकर्णी, 'शेवटचे हिरवे पान' 'काजळमाया' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७२, पृ. क्र. ५१
१९. जी.ए.कुलकर्णी, 'तळपट', 'पिंगळावेळ' पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९७७, पृ. क्र.१३८
२०. जी.ए.कुलकर्णी, 'वीज', 'पिंगळावेळ' पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९७७, पृ. क्र.८६
२१. जी.ए.कुलकर्णी, 'फुंका', 'पिंगळावेळ' पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९७७, पृ. क्र.१२१
२२. जी.ए. कुलकर्णी 'बाधा', 'हिरवे रावे', पॉप्युलर प्रकाशन, १९६२ पृ. क्र. ८५

२३. जी.ए.कुलकर्णी, 'काकणे' पारवा, ,पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६०, पृ. क्र. १
२४. वामन देशपांडे,'अलौकिक प्रतिभेचे जीए', महाराष्ट्र टाइम्स, ११ डिसेंबर १९८८
२५. ग. प्र. प्रधान, 'थोर कथालेखकाच्या जीवनाचे विपर्यस्त चित्रण' महाराष्ट्र टाईम्स, ११ डिसेंबर १९८८
२६. धोंडो विठ्ठल देशपांडे, 'जीएंच्या कथारू एक अन्वयार्थ, मौज प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९९०, पृ. क्र. ६
२७. वि.गो. कुलकर्णी, 'अलौकिक प्रतिभेला मुजरा, महाराष्ट्र टाईम्स, ५मे १९९१
२८. एस.डी. इनामदार, 'प्राक्तनाचे वेध', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९९९
२९. 'वेदनेचा वेध', महाराष्ट्र टाइम्स. १२ डिसेंबर १९८७
३०. वेगळ्या वाटेवरचा प्रतिभावंत' , लोकसत्ता १२ डिसेंबर १९८७
३१. 'गूढयात्री जी.ए.कुलकर्णी– रेणू देशपांडे, लोकसत्ता, २० डिसेंबर १९८७

LBP PUBLICATION